(१)

# जाहीर निविदा — नोटीस

**विषय :—** जिल्हा न्यायालय, पुणे व त्यांचे अखत्यारीतील न्यायालयांच्या संगणकासाठी वापरात असलेल्या सर्व प्रकारच्या प्रिंटरचे टोनर रिफिलींग व रिफर्बीशिंग करणेसाठी दोन वर्षाकरिता सदर कामाचा सेवा संविदा करारनामा करण्याकरिता स्थानिक बाजारपेठेतून संबधीत खाजगी विक्रेता/पुरवठादार/कंपनी यांच्या कडून दरपत्रक मिळणेबाबत...

मा. खरेदी समिती जिल्हा न्यायालय, पुणे. यांचा दिनांक :.०९/१०/२०२५ रोजीच्या आदेशान्वये जिल्हा न्यायालय, पुणे व त्यांचे अखत्यारीतील न्यायालयांच्या संगणकासाठी वापरात असलेल्या सर्व प्रकारच्या प्रिंटरचे टोनर रिफिलींग व रिफर्बीशिंग करणेसाठी दोन वर्षाकरिता सदर कामाचा सेवा संविदा करारनामा करण्याकरिता मागविण्यात येणा—या दरपत्रकाचा तपशिल खालील प्रमाणे.

| कॅनॉन एलबीपी १५१ डी डब्ल्यु (Cartrage 337) | | कॅनॉन एलबीपी २४६ डी डब्ल्यु (Cartrage 70, Cartrage 70H) | | क्योसेरा एम २०४० डी एन— (Kyocera TK-1178) | |
|---|---|---|---|---|---|
| रिफर्बीशींग व रिफिलिंग प्रतिनग सर्व करांसह एकत्रित दर | रिफिलिंगचा प्रतिनग सर्व करांसह एकत्रित दर | रिफर्बीशींग व रिफिलिंग प्रतिनग सर्व करांसह एकत्रित दर | रिफिलिंगचा प्रतिनग सर्व करांसह एकत्रित दर | रिफर्बीशींग व रिफिलिंग प्रतिनग सर्व करांसह एकत्रित दर | रिफिलिंगचा प्रतिनग सर्व करांसह एकत्रित दर |
| | | | | | |

**याकरिता अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.**

०१. रिफर्बीशींग व रिफिलिंग प्रतिनग दर. राज्य शासनाचा कर (एस.जी.एस.टी) केंद्र शासनाचा कर (सी.जी.एस.टी) सर्व करांसह एकत्रित दर दरपत्रकात नमुद करावे.

०२. आपले दरपत्रक हे आपल्या संस्थेच्या लेटर हेड वरती सादर करावेत.

०३. टोनर ची रिफर्बीशींग व रिफिलिंगचे संपूर्ण काम हे संगणक विभागातील संबधीत कर्मचारी यांच्या समक्ष करणे आपणावर बंधकारक असेल.

०४. दरपत्रक हे शासनाच्या प्रचलित सर्वकरांसह सादर करावेत.

०५. टोनरच्या रिफर्बीशींग व रिफिलिंग/रिफीलींग रिफील करीता वापरण्यात येणारी पावडर ही ITDL & FORMJET या कंपन्यांची पावडर किंवा यापेक्षा उत्तम दर्जाची व नामांकित कंपणीची वापरणे आवश्यक बधनकारक आहे.

०६. सदरची प्रक्रिया रदद् करणे तसेच दरपत्रक मंजुर/नामंजुर करणे याबाबतचे सर्व अधिकार हे या कार्यालयाच्या मा. खरेदी समितीने राखून ठेवण्यात आलेले आहे.

०७. आपले दरपत्रक आज पासून दिनांक .२८/१०/२०२५ सायं ठिक : ०५.०० पर्यंत नाझर कार्यालय, जिल्हा न्यायालय, पुणे. येथे मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश सो, जिल्हा न्यायालय व सत्र न्यायालय, पुणे यांच्या नावे पोहचतील असे बंद लिफाफ्यात पाठविण्यात यावे व त्यावर जाहिर निविदा नोटीस क्रमांक नमुद करण्यात यावा.

०७. सर्वकरांसह जागेपोहच रिफर्बीशींग व रिफिलिंग/रिफीलींग टोनर देण्याचे दरपत्रकासह सादर करणे बंधनकारक आहे.

०९. इतर आवश्यक अटी व शर्ती सोबत जोडले असे.

हुकूमावरून,
(सही) ९/१०/२०२५
प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, पुणे.

दिनांक :— .०९/१०/२०२५
**जाहीर नोटस क्र : २०**

(2)

# दरपत्रका सोबत सादर करावयाची माहिती.

| | |
|---|---|
| निविदा/दरपत्रक मागविणाऱ्या कार्यालयाचे नांव | : जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे |
| कामाचे स्वरुप | : जिल्हा न्यायालय पुणे व त्यांचे अखत्यारीतील न्यायालय व कार्यालयांमधील प्रिंटरचे सर्व प्रकारचे टोनर रिफिलींग, रिफर्बीशिंग व फॅक्स मशिनचे टोनर इ. रिफिलींगचे काम करुन घेणेसाठीच्या कामाबाबत. |
| निविदेचा क्रमांक व | : निविदा /जाहिर नोटीस क्र......... |
| कार्यालयाचे नांव | : जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे. |
| कंत्राटदार संस्थेचे/ कंपनीचे नांव | : |
| कंत्राटदार संस्थेचा/कंपनीचा संपूर्ण पत्ता | : |
| कंत्राटदार संस्थेचा/कंपनीचा संपर्क दुरध्वनी | : |
| कंत्राटदार संस्थेचा/कंपनीचा नोंदणी क्रमांक | : |
| कंत्राटदार संस्थेचा/कंपनीचा जी.एस.टी. क्रमांक | : |

३

दरपत्रका सोबत सादर करावयाची माहिती.

**विवरणपत्र**

१. निविदा कंत्राटदाराचे / संस्थेचे / कंपनीचे नांव :—

२. निविदा धारकाकडे सदर कामाचा पुर्वीचा अनुभव आहे काय? :—
सध्या कोणकोणत्या संस्थेत काम चालु आहे. :—
त्याचा संपुर्ण तपशील आणि कार्याआदेशाची झेरॉक्स प्रत जोडवी.

३. निविदाकाराने स्वत:वर कोणताही गुन्हा दाखल नसल्याबाबतचे तसेच त्याच्या संदर्भात कोणतेही प्रकरण न्यायालयात प्रलंबित नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र दाखल करावे. :—

४. निविदाकाराने खालील बाबींची पुर्तता केली आहे काय ? :—

अे) कंपनी/संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत.

बी) कंपनी/संस्थेचे जीएसटी कराच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत.

सी) कंपनी संस्थेचे मागील एक वर्षाच्या आयकर प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती.

डी) कंपनी/संस्थचे पॅन कार्डची छायांकित प्रत.

ई) कंपनी/संस्थेचे राष्ट्रीयकृत बॅकेत बचत खाते किंवा चालू खाते असल्याबाबतच्या सर्व कागदपत्रांची छायांकित प्रत तपशिलासह.

पुणे.
दिनांक : / /२०२५

निविदाकाराचे नाव शिक्का व स्वाक्षरी

(4)

# जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे.

# जाहीर नोटीस/निविदा अटी व शर्ती

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, शिवाजीनगर, पुणे – ४११ ००५ हे जिल्हा न्यायालय, पुणे व त्यांचे अखत्यारीतील न्यायालये व कार्यालयांमधील प्रिंटरचे सर्व प्रकारच्या टोनर रिफिलिंग, रिफर्बीशिंग व फॅक्स मशिनच्या टोनर रिफिलिंगसाठी दोन वर्ष कालावधीसाठीचा सेवासंविदा करारनामा करणेसाठी निविदा/दरपत्रक मागवित आहेत.

**कामाचे स्वरुप :– जिल्हा न्यायालय, पुणे व त्यांच्या अखत्यारीतील न्यायालये व कार्यालयांमधील प्रिंटरचे सर्व प्रकारच्या टोनर रिफिलिंग, रिफर्बीशिंग व फॅक्स मशिनच्या टोनर इ. रिफिलिंगचे काम दोन वर्ष कालावधीसाठी अंदाजे रक्कम रु. ९,००,०००/– (रक्कम रुपये नऊ लाख फक्त) पर्यंत काम सेवासंविदा करारान्वये करुन घेणेबाबत.**

पुरवठादार यांनी या कार्यालयास प्रिंटर व फॅक्स मशीनचे सर्व प्रकारच्या टोनर रिफिलींग, रिफर्बीशिंगचे काम हे खालील अटी व शर्तीअन्वये करून दयावयाचे आहे. सदर अटी व शर्तींचा तपशिल खालील प्रमाणे :–

**अटी व शर्ती :–**

०१) निविदा अर्जामधील माहिती पुरवठादारांनी भरावयाची आहे.

०२) कंत्राटदारांनी/संस्थेनी/कंपनींनी निविदा प्रक्रियेसाठी निविदा अर्ज सादर करतांना त्यांचे कंपनीचे/संस्थेचे, नोंदणी प्रमाणपत्र/मागील एक वर्षाचे आयकर प्रमाणपत्र/पॅनकार्ड /आधार कार्ड/जीएसटी क्रमांक प्रमाणपत्र, शॉप ॲक्ट प्रमाणपत्र, तसेच राष्ट्रीयकृत बॅकेत खाते असल्याचा तपशिल ईत्यांदी कागदपत्रे या कार्यालयास सादर करावी लागतील. तसेच पुरवठादार यांनी ज्या ज्या संस्थांच्या प्रिंटरच्या टोनरचे रिफीलिंग/रिफर्बीशिंगचे व फॅक्स मशिनच्या टोनर रिफीलिंगची कामे करण्यात आलेली आहेत, त्या संस्थांची यादी, नावे, पत्ते वगैरेबाबतची माहिती निवीदेसोबत जोडण्यात यावी. सदर कागदपत्रे साक्षांकीत केलेली असावीत. या सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. तसेच सादर केलेल्या निविदा उघडतेवेळी संबंधीत निविदाकारांनी उपरोक्त प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती तांत्रिक निविदेसोबत न जोडल्यास तसेच मुळ प्रती तपासणीसाठी सादर न केल्यास त्यांचे निविदा अर्ज निविदा प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

. . २

०३) पुरवठादार यांनी सर्व प्रकारच्या प्रिंटरचे टोनर यांचेद्वारे काढण्यात आलेल्या प्रिंटरच्या टोनरची शाई तहहयात कायम टिकू शकेल तसेच टोनर ची रिफर्ब्रीशींग व रिफिलिंगचे संपूर्ण काम हे संगणक विभागातील संबधीत कर्मचारी यांच्या समक्ष करणे धकारक असेल आणि **टोनरचे रिफीलींग हे पूर्णपणे करून देण्याचे आमच्या वर बंधनकारक राहील** याबाबत लेखी लिहून देणे आवश्यक आहे व करारानाम्याद्वारे मान्य व कबुल करावे लागेल.

०४) टोनरच्या रिफर्ब्रीशींग व रिफिलिंग/रिफीलींग रिफील करीता वापरण्यात येणारी पावडर ही ITDL & FORMJET या कंपन्यांची पावडर किंवा यापेक्षा उत्तम दर्जाची व नामाकिंत कंपणीची वापरणे बधनकारक आहे तसेच प्रत्येक वेळे वापरण्यात येणारी पावडर ही उत्तम दर्जाची व नामाकिंत कंपणीची आहे किंवा नाही या बाबतचा पडताळणी मासिक अहवाल हा या कार्यालयाच्या संगणक विभागाकडून प्राप्त झाल्यानंतर सदरचा अहवाल हा समाधानकारक आहे किंवा असमाधानकारक आहे यानुसार झालेल्या कामाच्या देयकाची रक्कम अदा करणे किंवा अंशत: अदा करणे तसेच याबाबतचे सर्व अधिकार हे पुणे जिल्हा न्याय प्रशासन, जिल्हा न्यायालय, पुणे यांच्याकडे राखून ठेवण्यात आलेले आहे याबाबत लेखी हमीपत्रासह करारानाम्याद्वारे मान्य व कबुल करावे लागेल.

०५) पुरवठादार यांचेकडून रिफिलींग, रिफर्बीशिंगचे काम करून देण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या टोनर यांचेद्वारे काढण्यात आलेल्या (छपाईच्या) प्रिंटरच्याबाबतीत प्रिंटरची शाई तहहयात कायम टिकू शकली नाहीतर, जिल्हा न्यायालय, पुणे हे ठरवेल ती नुकसान भरपाई देण्याचे करारानाम्याद्वारे मान्य व कबुल करावे लागेल.

०६) पुरवठादार यांनी रक्कम रूपये ५०,०००/— (रूपये पन्नास हजार फकत)एवढया रक्कमेची बॅक गॅरंटी दयावी लागेल. सदरची बॅक गॅरंटी हि पुरवठादार यांचेकडून रिफिलींग, रिफर्बीशिंगचे काम हे या कार्यालयाच्या अटी व शर्तीअन्वये नसेल किंवा मध्येच काम बंद करून सेवा संविदा करार रदद केलेस सदरची बॅक गॅरंटीची रक्कम हि सरकार जमा केली जाईल.

०७) सदर सर्व टोनरचे रिफर्बीशिंग करतेवेळी त्यामध्ये पुढील प्रमाणे स्पेअर पार्ट बदलणे आवश्यक आहे १. टोनर चिप बदलणे २. टोनरचा ड्रम बदलणे ३. टोनरचे ब्लेड बदलणे ४. टोनर डेव्हलर्पर बदलणे ५. शाई बदलणे व त्याव्यतिरीक्त टोनरचे इतर साहित्य बदलून देण्याचे मान्य व कबुल करावे लागेल. तसचे टोनर हे प्रत्येक दोन रिफील नंतर एकदा रिफर्बीशिंग करावा लागेल म्हणजेच एकदा रिफर्बीशिंग व रिफीलींग केलेला टोनर हा त्यानंतर दोन वेळा रिफिलींग होणे आवश्यक आहे. त्यानंतरच पुन्हा तिस—यांदा सदर टोनरचे रिफर्बीशिंगचे काम करावे लागले अशा प्रकारे सदर टोनर रिफीलींग व रिफर्बीशिंगच्या कामाची साखळी असेल, आणि रिफर्बीशिंच्या वेळी टोनरच्या बदलण्यात येणा—या सर्व स्पेअर पार्टचे निवीदेमध्ये दिलेल्या दरामध्येच काम करुन देणे आवश्यक असल्याने, त्याबाबत वेगळे शुल्क आकारले जाणार नाही, त्यानुसारच निवीदाधारकाने सदरची निवीदा भरावी.

(6)



०८) टोनरची शाई प्रिंटरमध्ये पडून प्रिंटर खराब झाल्यास सदर प्रिंटरची दुरुस्ती ही टोनर रिफीलींग करणा—या पुरवठादाराने स्वखर्चाने करावयाची आहे.

०९) पुरवठादार यांनी सदर कामासाठी होणा—या देयकांच्या रकमा देणे संदर्भात जास्तीत जास्त दोन ते तीन महीन्यांचा विलंब होवू शकतो. परंतू त्यापेक्षा जास्त विलंब झाल्यास त्याबाबत कोणताही विलंब शुल्क/व्याज आकारले जाणार नाही असे मान्य व कबुल करावे लागेल. तसेच यदाकदाचित, शासनाकडून संबंधीत खर्चासाठीचे अनुदान प्राप्त होणेस विलंब झाल्यास कोणत्याही परिस्थितीत टोनरचा पुरवठा थांबणार नाही, असे पुरवठादार यांनी सदर कराराद्वारे मान्य व कबुल करावयाचे आहे.

१०) सदर टोनर यांचेबाबत कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण झाल्यास ती २४ तासांच्या आत त्याचे निवारण करावे लागणार आहे.

११) पुरवठादार यांनी सदर टोनर यांचे रिफिलिंग व रिफर्बीशिंग करुन त्यांचा पुरवठा २४ तासांच्या आत या कार्यालयास करावयाचा आहे.

१२) पुरवठादार यांचेशी दोन वर्षकालावधीसाठी सदर कामाबाबत सेवासंविदा करारनामा करण्यात येईल.

१३) पुरवठादार यांचेकडून सदर टोनरचे रिफीलिंग/रिफर्बीशिंगचे काम हे या कार्यालयास समाधानकारक न आढळल्यास त्यांना कोणतीही पुर्व सुचना न देता, सदर कामकाज बंद करण्यात येईल व त्याबाबत हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच सदरचा करार हा संपुष्ठात येईल याची नोंद पुरवठादारांनी घेण्यात यावी.

१४) तसेच सदर कामाबाबत या कार्यालयास आणखी काही सुचना दयावयाच्या झाल्यास, त्या आपणांस वेळोवेळी सुचीत करण्यात येतील व त्या आपणावर/पुरवठादाराव बंधनकारक राहतील.

१५) पुरवठादाराने उपरोक्त सर्व अटी व शर्तीचे पालन करीन असे रक्कम रू. ५००च्या स्टॅप वर हमीपत्र लिहून देण्यात यावे.

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, पुणे

ठिकाण : पुणे
दिनांक : ०९/०९/२०२५

# हमीपत्र

मी, श्री. ——————————————, प्रो. प्रा. —————————— ————————एंटरप्रायजेस, पत्ता, ——————————————————————————, संस्थेचा नोंदणी क्रमांक ——————————, संस्थेचा दुरध्वनी क्रमांक ———————, याद्वारे असे हमीपत्र लिहून देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत जाहिर करण्यात आलेल्या टोनर रिफिलिंग व रिफर्बीशिंगच्या कामाची निविदा/दरपत्रक भरताना निविदा/जाहीर नोटीस अर्जासोबतचे निविदा सूचनेमध्ये नमूद केलेल्या आपल्या कार्यालयातील कामाची माहीती करुन त्यानुसार निविदा/दरपत्रक भरली आहे. तसेच मी/आम्ही पुरवठादार सर्व अटी व शर्तीचे पालन करेण तसेच **टोनरचे रिफीलींग हे पूर्णपणे करून देण्याचे आमच्या वर बंधनकारक राहील तसेच टोनरच्या रिफर्ब्रीशींग व रिफिलिंग/रिफीलींग रिफील करीता वापरण्यात येणारी पावडर ही ITDL & FORMJET या कंपन्यांची पावडर किंवा यापेक्षा उत्तम दर्जाची व नामाकिंत कंपणीची वापरणे बधनकारक आहे.**

आपल्या कार्यालयाने सदर सेवेसाठी वेळोवेळी निर्गमित केलेले सुचना/निर्देशन आमचे कंपनीस बंधनकारक राहतील.

ठिकाण : पुणे
दिनांक : / /२०२५

स्वाक्षरी/—
(———————————)